**शाळा व्यवस्थापन समितीकडे नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन करण्याचे कार्य सोपवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१६०/एस.डी.-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २८ जुलै, २०२६.

**संदर्भ :-** १. गृह विभाग शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण ०५२६/प्र.क्र.१५७/विशा-३(अ), दिनांक २१ मे, २०२६
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण ११२५/प्र.क्र.२५१/२५ एसएम-१, दिनांक १६ एप्रिल, २०२५

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे संपूर्ण देशातून समूळ उच्चाटण करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी केंद्र व राज्यांच्या विविध विभागांमध्ये समन्वयाच्या माध्यमातून "A Whole-of-Government Approach to Narcotics" विकसित करण्यात आले आहे. या धोरणानुसार, राज्यातील विविध विभागांमध्ये समन्वय साधून अवैध अंमली पदार्थांची शेती/लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालणे आणि अंमली पदार्थाच्या प्रसारावर आळा घालण्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्याची कार्यवाही सुरू आहे.

गृहविभागाच्या संदर्भाधीन क्र.१ शासन निर्णय दिनांक २१-०५-२०२६ अन्वये बृहन्मुबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये लोकसहभागतून “ड्रग्स फ्री मुंबई” हे अभियान राबविण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समिती स्थापन करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने, राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन केल्यास विद्यार्थी व समाजातील इतर घटकांमध्ये अंमली पदार्थ व इतर प्रकारच्या व्यसनांविषयी जनजागृती निर्माण होऊ शकते. याकरिता शालेय स्तरावर नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समिती स्थापन करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

तथापि, संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक २ अन्वये, सध्या शाळास्तरावर कार्यरत समित्या पुढीलप्रमाणे आहेत:

१. शाळा व्यवस्थापन समिती
२. सखी सावित्री समिती
३. महिला तक्रार निवारण समिती / अंतर्गत तक्रार समिती
४. विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती

यातील शाळा व्यवस्थापन समितीकडे शालेय परिसर हा तंबाखू मुक्त होण्यासाठी कार्यक्रम अंमलबजावणीवर देखरेख आणि सनियंत्रण करण्याची जबाबदारी आहे. त्यास अनुसरुन शाळा व्यवस्थापन समितीकडे नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन कार्य सोपवण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समितीकडे नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन करण्याचे कार्य सोपविण्यात येत आहे. याअनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे कार्य करावे.

१. सदर समितीची प्रमुख जबाबदारी ही विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी नियमित जनजागृती करणे, ही राहील.

२. नशामुक्ती क्षेत्रात कार्यरत संस्था/ तज्ञ/ अधिकारी व या क्षेत्रासंबंधी अनुभवी व्यक्ती यांना संपर्क करून शाळेमध्ये त्यांचे सत्र आयोजित करावी.

३. विद्यार्थ्यांचे वेळोवेळी समुपदेशन करणे, वर्तनातील बदल ओळखणे, आवश्यकतेनुसार पालकांशी समन्वय साधणे.

४. तसेच गरज भासल्यास संबंधित तज्ज्ञांकडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी संदर्भित करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०७२८१७५२१३९६४९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=Personal, title=9656, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400089, st=Maharashtra, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.07.28 17:53:38 +05'30'

**( तुषार महाजन )**

**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

५. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,

६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. सर्व मंत्रालयीन विभाग,

८. शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने,

९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धी देण्यासाठी)

१०. सर्व विभागीय आयुक्त,

११. आयुक्त ( शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र ,पुणे
१३. शिक्षण संचालक ( प्राथमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च-माध्यमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१८. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ( सर्व )
१९. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / योजना), जिल्हा परिषद ( सर्व )
२०. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
२१. निवड नस्ती (कार्या.एस.डी.४)